(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात**
**दिवाणी अपिलीय अधिकारीता**

**रिट याचिका क्रमांक १०८२/ २०१९ ची**

१. मारुती गेनबा वीर
(मयत त्याच्या कायदेशीर वारसदारांमार्फत)

१अ. लक्ष्मीबाई मारुती वीर
वय : प्रौढ, व्यवसाय : शेती

१ब. दिलीप मारुती वीर
वय : प्रौढ, व्यवसाय : शेती

१ क. किसन मारुती वीर
वय : प्रौढ, व्यवसाय : शेती
सर्व राहणार - पिसाळ वाडी,
तालुका - खंडाळा, जिल्हा - सातारा

२. अण्णा गेनबा वीर
वय : ७५ वर्ष,व्यवसाय : शेती

३. शिवाजी गेनबा वीर
वय : ७० वर्ष,व्यवसाय : शेती

४. रामदास गेनबा वीर
वय : ६५ वर्ष, व्यवसाय : शेती

५. अंकुश गेनबा वीर
वय : ५५ वर्ष, व्यवसाय : शेती

६. लहूदास गेनबा वीर
(मयत त्याच्या कायदेशीर वारसदारां मार्फत)

६अ. संदीप लहूदास वीर

वय : २५ वर्ष व्यवसाय : शेती

सर्व राहणार - पिसाळवाडी, श्रीवळ,

तालुका : खंडाळा, जिल्हा : सातारा ........... याचिकाकर्ते

**विरुद्ध**

१. महाराष्ट्र सरकार,

महसूल आणि वन विभागामार्फत,

मंत्रालय मुंबई - ४०० ०३२.

२. जिल्हा पुनर्वसन अधिकारी,आणि उप जिल्हाधिकारी

सातारा, जिल्हा सातारा.

३. उपविभागीय अधिकारी,

वाई विभाग, सातारा.

४. अतिरीक्त आयुक्त,

पुणे विभाग, पुणे. .......... उत्तरवादी

-----------

श्री विश्वजीत एस. कापसे सह मिस फ्रीडी भेडा - अर्जदारकरिता

मिस एम. एस. बने, अतिरीक्त सरकारी वकिल - उत्तरवादींकरिता/राज्य

-----------

**न्यायमंच :** न्या. आर. डी. धनूका आणि एम. एम. साठ्ये

राखीव दिनांक : २५ जानेवारी, २०२३

घोषीत दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२३

## : न्यायानिर्णय (न्या. एम. एम. साठ्ये द्वारे ) :

१. विधीनिर्णय. विधीनिर्णय (नोटीस) परतावायोग्य. विद्वान अतिरिक्त सरकारी वकील उत्तरवादी/ राज्य शासनाकरता नोटीसची बजावणी करण्याचा आग्रह सोडून देत आहेत. सर्वसंमतींनी अंतिम निर्णयाकरिता याचिका घेण्यात आली.ही याचिका भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ अन्वये दाखल करण्यात आली आहे. ज्यामध्ये विशेष भूसंपादन अधिकारी क्रमांक १९ सातारा यांनी रीट याचिकेतील गट क्रमांक ५३३, ८४ आर क्षेत्रफळाची गाव धनगर वाडी तालुका खंडाळा जिल्हा सातारा येथील जमिनीबाबत पारित केलेला आक्षेपित निवाडा क्रमांक भूसं/१९/एस. आर./३६२, दिनांक १९.३.१९९६ रद्दबादल करून खारिज करण्याची प्रार्थना केली आहे. सुरुवातीला अर्ज क्रमांक एलएसटी /३५१७/आयएनओ २३/ए ३ हा अर्ज नामंजूर करून, त्यास महसूल व वनमंत्री यांनी पारित केलेला दिनांक १०/०८/२०१८ चा आक्षेपित आदेश रद्द करण्याकरता प्रार्थना करून याचिका दाखल करण्यात आली होती.भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ४८ अन्वे दाखल याचिकाकर्त्यांची भूसंपादनातून रीट जमीन काढण्याकरता केलेल्या अर्ज नामंजूर कायम ठेवून सदर आदेश पारित करण्यात आला. परंतु त्यानंतर याचिकेत दुरुस्ती करून निवाडा रद्द करण्याची प्रार्थना समाविष्ट करण्यात आली आहे.

३. ही याचिका निकाली काढण्यासाठी आवश्यक असलेली थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे :

(i) याचिकाकर्त्यांच्या कुटुंबाने शिरवळ गावात आणि धनगरवाडी गावात जमिनी धारण केलेल्या होत्या.शिरवळ गावातील जमिनीचे क्रमांक ३०१, ३०६, ३१०आणि ३१४

असे होते जिचे पोटखराबा ४३ आर सह क्षेत्र २ हेक्टर ३८ आर होते. धन्गरवाडी गावातील जमिनीचा क्रमांक 533 आणि एकूण क्षेत्र दोन हेक्टर १० आर होते. अशाप्रकारे याचिकाकर्त्यांनी मूलतः ४ हेक्टर- ४८ आर जमीन धारण केलेली होती.

ii) दिनांक ०५.०२.१९८६ रोजी महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६ च्या कलम ११(१) खाली दिनांक ०५.०२.१९८६ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली, ज्याद्वारे सदर अधिनियमाच्या तरतुदी नीरा (देवघर ) प्रवाही- नि-उपसा सिंचन प्रकल्पाला लागू करण्यात आल्या आणि पुष्कळ गावांसह याचिकाकर्त्यांची दोन्ही संपूर्ण गावे शिरवळ आणि धनगरवाडी लाभधारक परिमंडळ म्हणून अधिसूचित करण्यात आलेली होती.

iii) दिनांक २८.११.१९८९ रोजी याचिकाकर्त्यांची शिरवळ गावातील जमीन भूमीसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ४ खाली शिरवळ येथील क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी अधिसूचित करण्यात आली आणि अखेरीस दिनांक ०३.०४.१९९१ रोजी याचिकाकर्त्यांच्या शिरवळ येथील जमिनी संपादित करण्यासाठी निवाडा पारित करण्यात आला.हा निवाडा यापुढे संक्षिप्ततेसाठी "१९९१चा पूर्वीचा निवाडा" म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येत आहे.हा नीरा देवघर प्रकल्प किंवा याचिकाकर्त्यांच्या धनगरवाडी गावातील जमिनीशी संबंधित नव्हता.

iv) दिनांक २३.०६.१९९३ रोजी महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ च्या कलम १३(१) खालील अधिसूचनेद्वारे धनगरवाडी गावातील १३८ हेक्टर आणि ८८ आर क्षेत्र निरा-देवघर पाटबंधारे सिंचन प्रकल्प बाधित व्यक्तींसाठी लाभधारक परिमंडळ म्हणून घोषित करण्यात आले होते.

v) दिनांक ३०.०३.१९९४ च्या अधिसूचनेद्वारे याचिकाकर्त्यांची गाव धनगरवाडी येथील ८४ आर जमीन भूमी संपादन अधिनियमाच्या कलम ४ खाली निरा-देवघर पाटबंधारे प्रकल्पाने बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी अधिसूचित करण्यात आली आहे.

vi) याचिकाकर्त्यांनी हरकत निवेदन दिनांक ०५.०७.१९९४ रोजी दाखल करून भूसंपादन अधिकारी यांना कळविले की, १९९१ चे पूर्वीचे संपादन याच कार्यालयाने याचिकाकर्त्यांच्या गाव शिरवळ येथील जमिनीबाबत केले आहे आणि त्यांची धनगरवाडी येथे जमीन संपादित करू नये अशी विनंती केली, कारण त्यांच्याकडे फारच कमी जमीन शिल्लक राहील जी  त्यांच्या मोठ्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी अपुरी असेल.

vii) भूमिसंपादन अधिनियमाच्या कलम ५ अ खालील दिनांक २८.०४.१९९४ च्या अहवालाने, विशेष भूसंपादन अधिकारी क्रमांक १९, सातारा यांनी याचिकाकर्त्यांची त्यांची धनगरवाडी येथील जमीन (संपादनातून) वगळण्याची प्रार्थना याचिकाकर्त्यांनी धारण केलेली ४ हेक्टर ४८ आर जमीन लागू असलेल्या टप्यात येते, या कारणास्तव फेटाळली.

viii) आक्षेपित निवाडा दिनांक १९.०३.१९९६ रोजी भूमी संपादन अधिनियम १८९४ च्या कलम ११ खाली पारित करण्यात आला आणि याचिकाकर्त्यांची धनगरवाडी गावातील गट क्रमांक ५३३ मधील ८४ आर क्षेत्रफळाची रीत जमीन संपादित करण्यात आली.

४) याचिकाकर्त्यांसाठी विद्वान वकील श्री कापसे आणि उत्तरवादीसाठी कुमारी बने , अतिरिक्त सरकारी वकील यांचे म्हणणे ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले.

५) श्री कापसे यांनी याचिकेशी जोडलेल्या विविध कागदपत्रांद्वारे वरील तारखा आणि घटनांचे स्पष्टीकरण दिले. त्यांनी असे निवेदन सादर केले की, याचिकाकर्ते यांची बाजू अशी की, त्यांनी शिरवळगाव येथील धारण केलेल्या एकूण ४ हेक्टर ४८ आर जमिनीपैकी २ हेक्टर, १८ आर जमीन १९९१ च्या आधीच्या निवाडयाअंतर्गत काही अन्य प्रकल्पासाठी (क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय) आधीच संपादित करण्यात आली होती आणि त्यांच्याकडे धनगरवाडी येथे फक्त दोन हे. १० आर जमीन शिल्लक होती.त्यांनी पुढे सादर निवेदन केले की, जेव्हा आक्षेपित निवाडा पारित करण्यात आला आणि धनगरवाडी येथील जमीन नीरा देवघर प्रकल्प आणि बाधित व्यक्तींसाठी संपादित केली होती तेव्हा याचीकाकर्ते महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ च्याअनुसूचीचा भाग - दोन च्या टप्पा तीन नुसार लागू असलेला टप्पा ३ हे. २३ आर पेक्षा कमी जमीन धारण करीत होते.

६) श्री कापसे यांनी सादर निवेदन केले की, याचीकर्त्यांनी दिनांक ०६.०८.१९९६ च्या तथाकथित ताबा पावतीवर स्वाक्षरी केलेली नाही किंवा आक्षेपित निवाडा अन्वये कोणतीही भरपाई त्यांना मिळालेली नाही. रिट जमीन याचिकाकर्त्यांच्या ताब्यात आहे. याचिकाकर्ते धनगरवाडी गावच्या तलाठ्याने दिनांक २३.१०.२०१२ रोजी निर्गमित केलेल्या प्रमाणपत्रावर अवलंबून आहेत, ज्यामध्ये याचिकाकर्त्यांकडे एकूण १ हे. ३३ आर क्षेत्राशिवाय दुसरी कोणतीही जमीन नाही, असे दर्शविण्यात आले आहे. तसेच शिरवळ गावच्या तलाठ्याने निर्गमित केलेल्या दिनांक २९.११.२०१२ च्या

प्रमाणपत्रात नमूद केले आहे की, याचिकाकर्त्यांनी शिरवळ गावात कुठलीही जमीन धारण केलेली नाही. असा युक्तिवाद करण्यात आला की, त्याच कार्यालयाने आधीची अधिसूचना आणि आधीचा निवाडा याचिकाकर्त्यांच्या शिरवळ गाव येथील इतर जमिनी बाबत निर्गमित केली होती आणि म्हणूनच त्याच कार्यालयाने धनगरवाडी गावातील रिट जमिनीच्या संदर्भात आक्षेपित निवाडा पारित केला नसावा.

७) याउलट उत्तरवादी / राज्य यांच्या वतीने उपस्थित सहायक सरकारी अभियोक्ता श्री. बने उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) सातारा यांनी सत्यप्रतिज्ञेवर उत्तरादाखल केलेल्या दिनांक ४/०६/२०१९ रोजीच्या प्रतिज्ञापत्राकडे बाणे यांनी आमचे लक्ष वेधले. राज्य सरकारच्या वतीने असा युक्तीवाद करण्यात आला की, याचिकाकर्त्यांने धारण केलेल्या जमिनीसाठी आणि टप्पा लागू करण्यासाठी संबंधित दिनांक ही मुळ अधिसूचनेची दिनांक आहे ज्याद्वारे निरा देवघर सिंचन प्रकल्पातील जमीनी अधिसूचित करण्यात आल्या होत्या. असा युक्तिवाद करण्यात आला की, सदर दिनांक ०५.०२.१९८६ रोजी, शिरवळ गावातील याचिकाकर्त्यांची जमीनसुध्दा उपलब्ध होती आणि अधिसूचित करण्यात आली होती आणि म्हणूनच, त्या दिनांकास याचिकाकर्त्यांनी धारण केलेली जमीन विचारात घेणे आवश्यक घ्यावी लागेल. तिने असे सादर केले की, संबंधित वेळी याचिकाकर्त्यांने धारण केलेली एकूण जमिन (४ एच, ४८ आर) ही ३ एच, २३ आर च्या लागू केलेल्या टप्प्यापेक्षा जास्त होती. पुढे असा युक्तीवाद करण्यात आला की, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६ या कायदयाच्या कलम 16 सह अनुसूची अ नुसार जमिन संपादन

करण्याकरीता अधिसूचनेच्या कलम 11 मधील दिनांकास एखादया व्यक्तीने धारण केलेली जमिन संबंधित आहे.

८) असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यानंतर सदर अधिसूचनेअंतर्गत येणाऱ्या जमिनीच्या हस्तांतरणावर विशेषतः पोटविभाजन आणि विभागणी यावर निर्बंध असल्यामुळे ही तारीख उचित ठरेल. असा युक्तिवाद करण्यात आला की, यापूर्वी दिनांक ०३/०४/१९९१ रोजी दिलेल्या निवाड्यानुसार जरी शिरवळ गावातील याचिकाकर्त्यांच्या जमिनी संपादित केल्या गेल्या असल्या तरी, याचिकाकर्त्यांनी धारण केलेल्या जमिनित निश्चित तारखेनंतर घट झाल्यामुळे ती बदललेली मानली जाणार नाही.विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांच्या मते, दिनांक १९/०३/१९९६ रोजीच्या निवाडा हेतूसाठी दिनांक ०३/०४/१९९१ रोजी याचिकाकर्त्यांनी धारण केलेली जमीन विचारत घेतली जाऊ शकत नाही. पुढे असा युक्तिवाद केला की, पूर्वीचा दिनांक ०३/०४/१९९१ रोजीचा निवाडा हा पुनर्वसन कायद्यांतर्गत नव्हता. मुख्यतः या युक्तीवादास विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी मा. मंत्री महोदयांनी पारित केलेल्या आक्षेपित निवाडा आणि आक्षेपित आदेश यास पाठिंबा दिला.

## कारणे आणि निष्कर्ष

९) आम्ही अभिलेखाचे अवलोकन केले, विशेषतः दिनांक ०५/०२/१९८६ ची अधिसूचना, जी महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६ अंतर्गत निर्गमित करण्यात आली होती, ज्यामध्ये याचिकाकर्त्यांच्या दोन्ही जमिनींसह संपूर्ण शिरोळ आणि धनगरवाडी गावे अधिसूचित करण्यात आली होती. आम्ही यापूर्वीचा

दिनांक ०३/०४/१९९१ रोजीचा निवाडा जो भूसंपादन कायद्याच्या कलम ४ अंतर्गत जारी केलेल्या दिनांक २८/११/१९८९ रोजीच्या अधिसूचनेवर आधारित होता आणि दिनांक १९/०३/१९९६ रोजीचा आक्षेपित निवाडा जो भूसंपादन कायद्याच्या कलम ४ अंतर्गत निर्गमित केलेल्या दिनांक ३०/०३/१९९४ रोजीच्या अधिसूचनेवर आधारित होता, याचेही अवलोकन केले आहे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, दोन्ही निवाडे हे एकाच भूसंपादन कार्यालयाने म्हणजेच विशेष भूसंपादन अधिकारी क्रमांक १९, सातारा, यांनी पारित केलेले आहेत आणि त्यामुळे पूर्वीचे निवाडे आणि त्यांचे कामकाज हे पूर्णपणे त्यांच्या माहितीचे आणि त्यांच्या अभिलेखात आहे.

१०) पुढे हे नोंद घेणे महत्त्वाचे आहे की, यापूर्वीचा निवाडा हा शिरवळ येथील क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या संपादना संदर्भात होता आणि आक्षेपित निवाडा हा निरा देवघर सिंचन प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी होता.सदर दोन्ही निवाडे जरी ते वेगवेगळ्या प्रकल्पासाठींचे आहेत, त्याशिवाय ते भूसंपादन कायद्याच्या कलम ४ नुसार निर्गमित केलेल्या वेगवेगळ्या अधिसूचना आणि त्या अंतर्गत जाहीर केलेल्या वेगवेगळ्या घोषणा यांच्याकडे निर्देश करतात.जरी दोन्ही निवाडे हे भूसंपादन कायद्याअंतर्गत असले तरी, यापूर्वीचा निवाडा याचा उद्देश हा महाविद्यालयाच्या शैक्षणिक हेतूसाठी संपादन करणे हा होता आणि आक्षेपित आदेश ज्या अंतर्गत धनगरवाडी गावातील रिट जमीन ही संपादित केली, तो निरा देवघर सिंचन प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी होता.

११) जर असे असेल तर तिच दिनांक ०५.०२.१९८६ रोजीची कलम ४ अंतर्गत अधिसूचना कोणत्या रीतीने लागू होईल हे उत्तरवादी- राज्य यांनी

उत्तरादाखल सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात स्पष्ट केलेले नाही.हे देखील लक्षात घेणे आवश्यक आहे की, दिनांक ०५/०२/१९८६ रोजीची अधिसूचना ज्याच्यावर उत्तरवादी राज्य यांची भिस्त आहे ती महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६ च्या कलम ४ अंतर्गत निर्गमित करण्यात आली होती आणि ती क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय शिरवळ येथील प्रकल्पासाठी नाही तर केवळ निरा देवघर सिंचन प्रकल्पासाठी लागू करण्याचे नमूद केले होते.

१२) उत्तरवादी / राज्य यांचा युक्तिवाद की दिनांक ०५/०२/१९८६ च्या अधिसूचनेनंतर हस्तांतरण हे निर्बंधित करण्यात आले होते आणि त्यामुळेच याचिकाकर्त्यांनी सदर तारखेस धारण केलेली जमीन विचारात घेतली पाहिजे हा तर्कदृष्ट युक्तिवाद या सोप्या कारणास्तव आहे की, पूर्वीच्या दिनांक ०३/०४/१९९१ रोजीच्या निवाड्यांतर्गत याचिकाकर्त्यांनी धारण केलेल्या जमिनीच्या भागाचे संपादन हे याचिकाकर्त्यांनी हयात व्यक्तींमध्ये केलेले हस्तांतरण किंवा खाजगी तृतीय पक्षाच्या लाभात ऐच्छिक हस्तांतरण/ विक्री/ गहाण याद्वारे केलेले हस्तांतरण नाही.ते कायद्याच्या अंमलबजावणीद्वारे याचिकाकर्त्यांनी धारण केलेल्या जमिनीचे (तिचा भाग) अनिवार्य संपादन आहे आणि ते सुद्धा पूर्णपणे भिन्न प्रकल्पासाठी (पशुवैद्यकीय महाविद्यालय) आहे. याचिकाकर्त्यांनी पूर्वीच्या निवाड्यामुळे कोणत्याही निर्बंधाचे उल्लंघन केलेले नाही.पूर्वीच्या अधिसूचनेमुळे प्रतिबंधित केलेल्या हस्तांतरणामुळे कायद्याच्या अधीन असलेल्या सक्तीच्या संपादनावर परिणाम होईल आणि त्यामुळेच धारण जमिनीमध्ये घट करण्याचा विचार केला जाऊ शकत नाही, असे भाष्य विपर्यास्तापेक्षा कमी अर्थाचे नाही.जर अशा प्रकारची अर्थउकल एखाद्या नागरिकास

लागू करण्यात आली ती देखील स्वामित्वहारी विधीविधानाच्या संदर्भात जसे भूसंपादन कायदा तर ती न्यायाची थट्टा ठरेल.

१३) या कारणास्तव आम्ही उत्तरवादी / राज्य यांच्या वरील युक्तिवादाने प्रभावित झालो नाही.दिनांक ३०/०३/१९९४ च्या अधिसूचनेच्या तारखेला लागू असलेल्या महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ च्या अनूसूचीच्या भाग II टप्पा III चे अवलोकनावरून असे दिसून येते की, '३ एच आणि २३ आर पेक्षा जास्त नाही' अशा टप्प्यासाठी संपादित करावयाचे क्षेत्र हे 'निरंक' आहे.त्यामुळे साहजिकच दिनांक १९/०३/१९९६ रोजीच्या आक्षेपित आदेशाची अधिसूचना (३०/०३/१९९४) च्या तारखेस याचिकाकर्त्यांनी धारण केलेली जमीन ही उक्त टप्प्याच्या मर्यादेपेक्षा कमी होती.याचिकाकर्त्यांची धनगरवाडी येथील रिट जमीन ही कायद्यानुसार संपादित करता आली नसती.

१४) विद्वान मंत्र्यांच्या आक्षेपित आदेशाचे अवलोकन केले असता ते असे दर्शवते की, त्यातील परिच्छेद क्रमांक ६.१ ते ६.४ मध्ये कारणे नमूद केली आहेत. २ भिन्न उद्दिष्टांकरिता २ भिन्न अधिसूचनेतंर्गत २ भिन्न निवाडे यांचे पैलू पूर्णपणे चुकले आहेत आणि दिनांक १९/०९/२०१६ च्या कलम ४८(१) अंतर्गत याचिकाकर्त्यांचा अर्ज फेटाळण्याच्या आदेशावरून असे दिसते की ,सदर कलमांतर्गत अधिकार पुन्हा वापरता येणार नाही, या मर्यादित कारणाच्या आधारावर कायम केला आहे.

१५) ज्या ताबा पावती वर उत्तरवादी यांनी त्यांची भिस्त ठेवली होती, ती याचिकाकर्त्यांनी नाकारली आहे.दिनांक ०६/०८/१९९६ रोजीच्या सदरच्या ताबा पावतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ती रिट जमिनींसह विविध

जमिनींसाठी बनवलेली एक छापील स्वरूपाची पावती असून, त्यावर प्राधिकार्यांनी आणि इतर भूधारकांनी आपल्या स्वाक्षऱ्या केल्या आहेत; पण त्यावर याचिकाकर्त्यांची (वीर) स्वाक्षरी नक्कीच नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे की उत्तरवादी/ राज्य यांनी याचिकाकर्त्यांनी सदर ताबा पावतीवर स्वाक्षरी न केल्याचे विशिष्ट विधान नाकारले नाही.तसेच उत्तरवादी / राज्य यांनी त्यांच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, याचिकाकर्त्यांसाठी नुकसान भरपाई ही महसूल खात्यात ठेवली/ जमा केली जाते याचाच अर्थ असा की, ती याचिकाकर्त्यांना दिली जात नाही.

१६) अभिलेखाचे काळजीपूर्वक लक्षपूर्वक अवलोकन केल्यास असे दिसून येते की, यापूर्वी सन २०१२ मध्ये संबंधित तहसीलदारांनी संबंधित उपजिल्हाधिकारी यांना दिनांक १५/१२/२०१२ च्या पत्रव्यवहारात रिट जमीन आक्षेपित आदेश मधून काढून टाकण्यासाठी / वगळण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिले. मंडळ अधिकाऱ्यांने आधीच दिलेल्या अशा शिफारशी लक्षात घेता, चुकीचा टप्पा लागू केल्यामुळे आक्षेपित निवाडा पारित झाला तेव्हा संबंधित वेळी जमीनधारणेमध्ये खरोखरच घट झाली होती. संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांनी संबंधित अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना दिनांक २६/०३/२००२ रोजी जारी केलेल्या पत्रात तत्सम बाबी नमूद करून कार्यवाही न करता दुर्लक्ष केल्याचे नमूद केले आहे.या पत्रव्यवहारांवर/ ना हरकत प्रमाणपत्रावर/ शिफारशींवर कारवाई का केली गेली नाही हे आम्हास समजले नाही.

१७) अभिलेखावरून असे दिसून आले की, याचिकाकर्त्यांना याचिकेत दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात आली होती, ज्यामुळे आक्षेपित निवाड्याला आव्हानित करण्यासाठी ठाम विधाने, कारणे आणि प्रार्थना समाविष्ट केले जाऊ

शकतात.उत्तरवादी/ राज्य यांनी आक्षेपित निवाड्याला उशिराने दिलेल्या आव्हानाबाबत हरकत घेण्यासंबंधी कोणतेही अतिरिक्त उत्तर दाखल केलेले नाही. अभिलेखावरून हे देखील दिसून येते की, संबंधित विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे दिनांक ०५/०७/१९९४ रोजी आक्षेप नोंदवून याचिकाकर्ते त्यांच्या खटल्याचा पाठपुरावा करीत होते, हे नाकारण्यात आले आहे.याचिकाकर्त्यांनी रिट जमीन आक्षेपित निवाड्यामधून वगळण्यासाठी अतिरिक्त आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे दिनांक १४/१२/२००० रोजी अर्ज दाखल केला होता आणि तो दिनांक १९/०९/२०१६ रोजी फेटाळण्यात आला होता.

१८) त्यानंतर याचिकाकर्त्यांनी राज्य शासनातर्फे विद्वान मंत्री महोदय यांच्यासमोर अपील अर्ज क्रमांक एल एस टी - ३५१७/ आय एन ओ - २३/ ए -२३ दाखल केला, ज्यामध्ये दिनांक १०/०८/२०१८ रोजी मा. मंत्री महोदयांनी आक्षेपित आदेश पारित केला ज्यामध्ये याचिकाकर्त्यांची तक्रार फेटाळून लावली.त्यानंतर याचिकाकर्त्यांनी प्रस्तुतची याचिका दाखल करून न्यायालयाचे दरवाजे ठोठावल्याचे दिसते.या तारखांचा विचार करता हे स्पष्ट होते की, याचिकाकर्ते त्यांच्या वादाचा कार्यतत्परतेने पाठपुरावा करत होते आणि त्या दृष्टीने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ नुसार आमच्या असाधारण अधिकार क्षेत्राचा वापर करण्यात आम्हाला कोणताही संदेह वाटत नाही.

१९) याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या प्रकरणाचा सारांश असा आहे की, ही एका कार्यतत्पर पक्षकाराची याचिका आहे ज्याची जमीन ही बेकायदेशीर लागू असलेल्या टप्प्याद्वारे संपादित केली गेली आहे, ज्याने ताबा सोडलेला नाही किंवा ज्याला

कोणतीही नुकसान भरपाई मिळालेली नाही. म्हणूनच वर वर्णन केलेली विशिष्ट तथ्ये आणि परिस्थितीत असे लक्षात येते की, सदर याचिकेमध्ये गुणवत्ता आहे आणि ती यशस्वी झालीच पाहिजे.

२०) म्हणून आम्ही खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहोत.

[अ ] खंड (ए) आणि (एए) मध्ये नमूद केलेल्या प्रार्थनेच्या संबंधाने याचिका मंजूर करण्यात येत आहे.याचिकाकर्त्यांची रिट जमीन ज्याचा गट नंबर ५३३ क्षेत्रफळ ८४ आर आहे आणि जी धनगरवाडी गाव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा येथे स्थित आहे त्या संदर्भातील दिनांक १९/०३/१९९६ रोजीचा आक्षेपित आदेश क्रमांक भूसंपादन/ १९/ एस आर/ ३६२ हा रद्दबातल करून खारीज करण्यात येत आहे.

[ब ] उत्तरवादींच्या संबंधित कार्यालयाला याचिकाकर्त्यांच्या बाजूने आवश्यक परिणामस्वरूप आदेश पारित करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत, ज्यामुळे रिट जमिनीच्या महसूल अभिलेखात योग्य ते बदल करता येतील. महसूल खात्यात जमिनीच्या संदर्भात जमा केलेली नुकसान भरपाईची रक्कम परत घेण्यास उत्तरवादी राज्य यास स्वातंत्र्य आहे.

[क] रिट याचिका मंजूर करण्यात येत आहे आणि उपरोक्त दृष्टीने विधीनिर्णय मंजूर करण्यात येत आहेत. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

[ड] सर्व संबंधितांनी अधिप्रमाणित केलेल्या या आदेशाच्या प्रतीनुसार कार्यवाही करावी.

(न्या. एम. एम. साठ्ये) (न्या. आर. डी. धनुका).

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x–x–x–x